Vol 1 Issue 12 Jan 2012

ISSN No : 2230-7850

## International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 12pp.1-4

ISSN:-2230-7850

Research Papers

# *महात्मा गांधी आणि धुळे जिल्हा*

***अनिल माणिकराव बैसाणे***
इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

### *प्रस्तावना :*

***रौलेट कायदा : गांधी आणि खानदेष***

या काळातील क्रांतीकारकांच्या गुप्त चळवळीचा निरुपात करण्यासाठी ब्रिटिश सरकारने रौलेट कायदा केला. या कायद्याने केवळ संशयावरून अटक करणं, अपील नाकारणे, अपराध्ययाला त्वरीत अटक करणे इ. अधिकार ब्रिटिश सरकारला मिळाले. रौलेट कायद्याला प्रतिसाद मिळाला. जालियनवाला बाग सभेत झालेल्या गोळीबारामुळे शेकडो लोक मरण पावले. सरकारी अत्याचाराने थैमान माजविले होते. शेवटी गांधींनी सत्याग्रहाची मोहीम तहकूब केली. त्यात 1 ऑगस्ट 1920 रोजी टिळकांचा मृत्यू झाला आणि गांधीजींच्या रुपानं एक नवी शक्ती उदयास आली.[1]

***म. गांधीजींच्या नेतृत्वातील असहकार चळवळ आणि धुळे जिल्ह्याचा सहभाग***

रौलेट कायद्याचा निषेध म्हणून गांधीजींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाची चळवळ व सर्वत्र हरताळ पाळण्यात आल्याने सरकारच्या दडपशाही धोरणामुळे ब्रिटिश सरकारशी असहकार हे धोरण आता गांधीजींनी स्वीकारले आणि एका जाहीर पत्रकान्वये मार्च 1920 मध्ये असहकाराचा मार्ग घोषीत केला. त्यासाठी सरकारी पदव्या व अधिकारांचा त्याग करणे, सरकारी दरबार, समारंभात असहकार पुकारणे, सरकारी शाळांवर बहिष्कार टाकणे व राष्ट्रीय शाळांची निर्मिती करणं, ब्रिटिश न्यायालयावर वकीलांनी व पक्षकारांनी बहिष्कार घालणे, प्रांतिक व केंद्रीय कायदे मंडळावर तसेच मतदानावर बहिष्कार टाकणे इत्यादी कार्यक्रम राबविण्याचे आवाहन गांधीजींनी जनतेला केले. त्यामुळे या चळवळीचे पडसाद सर्व देशभर उमटले.

मॉट–फर्ड कायद्याने लागू करण्यांत आलेल्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीत खानदेशच्या प्रमुख नेत्यांनी बहिष्कार टाकला. मतदारांनी मतदान करू नये असाही प्रचार करण्यात आला. शंकरराव देव, रामचंद्र ओगले, जावडेकर आदींनी निवडणुकीच्या बहिष्काराचा कार्यक्रम राबविला. गांधीजींच्या या चळवळीत खानदेशातील सरकारी कर्मचारी, महिला, विद्यार्थी उत्साहाने सामील झाले होते. धुळ्यात राष्ट्रीय शाळेत व्हावे असा प्रयत्न झाला. दोंडाईचे येथेही असे राष्ट्रीय शाळेचे प्रयत्न झाले आणि राष्ट्रीय सभेच्या कार्याला संघटनात्मक रचनेचे स्वरुप येत होते. सध्याच्या नंदुरबार व धुळे जिल्ह्यासह असहकार चळवळीचं स्वरुप व्यापक बनत चालले होते. मद्यपान निषेधाची चळवळही सुरू झाली होती.

5 मे 1921 रोजी गांधीजींनी नंदुरबारला जाहीर सभेत मुसलमानांना खिलाफत चळवळीला सहाय्य करण्याचे, कॉंग्रेसचे एक कोटी सदस्य बनविण्याचे, टिळक स्वराज्य फंडासाठी वर्गणी गोळा करण्याचे आवाहन केले. गांधीजींच्या नंदुरबार दौऱ्यामुळे नंदुरबारसह सर्व पश्चिम खाानदेशात लोकांत उत्साह निर्माण झाला होता. टिळक पुण्यतिथी निमित्ताने परदेशी कापडाची होळी पेटविण्यात आली. धुळे, नंदुरबार, दोंडाईचे येथे विदेशी कापडाची होळी करण्यात आली. याच काळात असहकाराच्या चळवळीपासून लोकांना परावृत्त करण्याचेही प्रयत्न धुळे जिल्ह्यात झाले. परंतु फारसा प्रतिसाद मिळाला नाही. उलट चळवळ वाढतच होती. दिवसेंदिवस स्वदेशी चळवळ वाढत असल्याचा उल्लेख सरकारी अहवालात आढळतो.[2]

***प्रिन्स ऑफ वेल्स्चे : धुळे जिल्ह्याचा बहिष्कार व असहकार चळवळीची स्थगिती***

याच काळात इंग्लंडच्या राजाचे प्रिन्स ऑफ वेल्स्चे भरतात आगमन झाले असता धुळे जिल्ह्यात कॉंग्रेसतर्फे बहिष्कार टाकण्यात आला, हरताळ पाळण्यात आला. साक्री येथे प्रांताधिकाऱ्याच्या निष्ठूर वागण्याने लोकांनी त्याच्या निषेधचा ठराव केला. साक्रीतील ही एक आश्चर्यकारक घटना होती. असहकाराच्या चळवळीने धुळे जिल्ह्यात तीव्र स्वरूप धारण केलेले होते. दोंडाईचे रेल्वे फ्लॅटफॉर्मवर कार्यकर्ते संधी साधून असहकारावर भाषणे देवून जनजागृती करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा उल्लेख सरकारच्या गोपनीय अहवालात वाचावयास मिळतो. सरकारने असहकार चळवळीला आवर घालण्यासाठी दडपशाहीचं धोरण स्वीकारले. चळवळ प्रगतीपथावर असतांना गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथे हिंसात्मक घटना घडल्यामुळे गांधीजींनी अचानक चळवळ स्थगित केल्याची घोषणा केली आणि जनतेला विधायक कार्यक्रम राबविण्याचा आदेश दिला. असहकार चळवळ अनपेक्षितपणे स्थगित केल्याने देशात नैराश्य पसरले. गांधीजींवर टिका होवू लागली व सरकारने त्यांना अटक केली. गांधीजींच्या निर्णयानुसार धुळे जिल्ह्यातील नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी विधायक कार्याकडे लक्ष दिले.

आता कॉंग्रेस अंतर्गत मतभेद उफाळून आले आणि असहकाराच्या कार्यक्रमात बदल करावा अशी मागणी होवू लागल्याने फेरवादी आणि नाफेरवादी असे दोन गट पडले. तथापि धुळे जिल्ह्यातील नेत्यांनी विधायक कामाकडेच लक्ष दिले होते.

मुळशी सत्याग्रह व धुळे जिल्ह्याचा सहभाग

मुळशी येथील धरण बांधण्याच्या ब्रिटिश सरकारच्या धोरणाला विरोध करण्यासाठी मुळशी सत्याग्रहात पश्चिम खानदेशवासियांनीही भाग घेतला. परंतु किती सत्याग्रही सहभागी झाले होते याची निश्चित माहिती मिळत नसली तरी पिंपळनेरचे अनंत

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 2012

देशपांडे आणि धुळ्याचे अनंत क्षिरे यांना मुळशी सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे तीन महीन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाल्याची नोंद आढळते.

### स्वराज्य पक्ष आणि धुळे जिल्हा

फेरवाद्यांचे नेते चित्तरंजन दास यांनी स्वराज्य पक्षाची स्थापना केली होती. धुळे येथे कायदेमंडळाच्या निवडणुका व प्रवेश करण्याच्या तत्वाला मानणारी मंडळी एकत्र येवून जावडेकरांच्या अध्यक्षतेखली स्वराज्य पक्षाची स्थापना करण्यात आली. प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका जाहीर झाल्या परंतु स्वराज्य पक्षाने खानदेशातून उमेदवार दिला नाही. पण या एका जागेसाठी धुळ्याचे शंकरराव देव स्वतंत्र उमेदवार असून त्यांना स्वराज्य पक्षाने पाठींबा दिला. मवाळ गटातर्फे गरुड तर ब्राह्मणेतर गटातर्फे सौंदाणकर उभे होते. या निवडणुकीत स्वतंत्र उमेदवार शंकरराव देव निवडून आले.

### धुळे जिल्ह्यातील खादी प्रसाराचे कार्य

गांधी व दास यांच्या समझोत्यानंतर धुळे जिल्ह्यात शंकरराव देव, बाळूभाई इत्यादी कार्यकर्ते खादीचा प्रसार व हिंदू:मुस्लिम ऐक्य, जनजागरण करण्याचा प्रयत्न करू लागले. भा. वा. भट, क्षिरे, बर्वे यांनी व्याख्याने दिली. जनजागरणासाठी श्रीधर क्षिरे यांनी देशभक्तीगिते, पोवाडे, नाटके, नकला इत्यादी बंद पडलेल्या कार्यक्रमाचे मेळावे सुरु केले. ष्सत्याग्रह प्रल्हादष् हे क्षिरेंचे नाटक खूपच गाजले. त्यातून राजद्रोहाची झलक दिसल्यामुळे सरकारने राजद्रोहाचा आरोप ठेवून दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. बहिष्काबरोबरच खानदेशात गांधींच्या खादी उत्पादन कार्याला सुतकताई, चरखा यांना प्रोत्साहन दिले जाऊ लागले. धुळे, शिंदखेडे, नंदुरबार या जिल्ह्यात खादी पैदाशीच्या कामाला संघटीत स्वरूप प्राप्त झाले. त्यासाठी फेब्रुवारी 1923 साली धुळे येथे महाराष्ट्र खादी मंडळाची स्थापना झाली. धुळे जिल्ह्यात खादी कार्याला चालना मिळाली. नगाव, कापडणे, सोनगीर या ग्रामीण भागात खादीचे उत्पादन सुरू केले होते.

हिंदू मुसलमान ऐक्य, खादीप्रसार व अस्पृश्यता निवारण इत्यादींना चालना देण्यासाठी गांधीजींनी 9 फेब्रुवारी 1927 ते 15 फेब्रुवारी 1927 असा एक आठवडा खानदेशचा दौरा करून खादी उत्पादनाला प्रोत्साहन दिले. शिंदखेडे तालुक्यात सवाई मुकटी हे खादी केंद्राच्या ग्राम संघटनेसाठी निवडून तेथील रामचंद्र पाटील यांचे मोठे सहकार्य मिळालं तर नंदुरबार जवळील नटावद हे आदिवासींचे गाव ग्राम सुधारणेसाठी निवडण्यात आले होते.[3]

### सायमन कमिशनवरील खानदेशवासियांची प्रतिक्रिया

1919 च्या कायद्याचा अभ्यास करण्यासाठी सायमन कमिशन भरतात आले. त्यात एकही हिंदी माणूस नाही म्हणून कमिशनवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. पश्चिम खानदेशातही याचे पडसाद उमटले. बहिष्कार टाकण्यात आला. भारत मंत्र्यांनी केलेल्या अहवानानुसार भारतीय राज्यघटनेचा मसुदा करण्यासाठी पं. मोतीलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने घटना मसुदा तयार केला. त्या नेहरु अहवालास मंजूरी देण्यासाठी धुळे येथे डॉ. घोगरेंच्या नेतृत्वाखली ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

### सविनय कायदेभंग चळवळ आणि धुळे जिल्ह्याचा सहभाग स्वातंत्र्य दिवस

वसाहतीचे स्वराज्याच्या मागणीला कॉंग्रेसमधील पं. नेहरु, सुभाषचंद्र बोस या तरुण नेत्यांचा विरोध होता. त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य हवे होते. तेव्हा नेहरु अहवाल सरकारला सादर करतेवेळी अहवाल एका वर्षाच्या आत मान्य न केल्यास संपूर्ण स्वातंत्र्याची कायदेभंगाची चळवळ सुरु करू असेही सांगण्यात आले होते. या चळवळीचे सर्व अधिकार कॉंग्रेसने म. गांधीजींना दिले होते. जनतेच्या मानसिकतेची तयारी पाहून गांधीजीही नव्या चळवळीसाठी सिद्ध झाले होते. हिंदुस्थानला वसाहतींचे स्वराज्य देण्यासाठी ब्रिटिश सरकार तयार नाही हे समजून गोलमेजपरिषदेवर बहिष्कार घालून कायदेभंग चळवळ हाती घेण्याचे ठरवून नेत्यांनी या राष्ट्रव्यापी चळवळीचे लढ्याचे सर्व अधिकार म. गांधी व त्यांच्या कॉंग्रेस कमिटीला दिले. 26 जानेवारी हा दिवस स्वातंत्र्यदिवस म्हणून पाळण्याचा निर्णय घेण्यात आला. धुळ्याच्या कार्यकर्त्यांनी प्रभात फेऱ्या काढून, जनजागृती करून हा दिवस साजरा केला.

### मिठाचा सत्याग्रह

सरकारने नेहरु अहवालाच्या मागण्या मान्य केल्या नाहीत म्हणून मिठाचा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेवून दुसरा लढा सुरू करण्यात आला. म. गांधीजींनी आपल्या निवडक सहकार्यासमवेत दांडीयात्रा साबरमती आश्रमापासून सुरू केली. सविनय कायदेभंग चळवळीची योजना राबविण्यासाठी महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांची मार्च 1930 मध्ये पुण्याला एक सभा झाली. या सभेसाठी धुळ्याचे शंकरराव ठकार हजर होते. त्यामुळे चळवळीचे पश्चिम खानदेशातील नेतृत्व ठकार यांच्याकडे सोपविण्यात आले. कायदेभंग चळवळीसाठी जनमत जागृत करण्याचे प्रयत्न करणारे सरदार वल्लभभाई पटेल यांना पकडून तीन महीन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. तेव्हा याचा निषेध करण्यासाठी शंकर देवांच्या अध्यक्षतेखाली धुळ्याला जाहीर सभा झाली होती. एका मणास 10 पैसे खर्च येणाऱ्या मिठावर 240 पैसे कर बसवून सरकारने गरीबांचे शेषण सुरू केले होते. त्यामुळे सरकारच्या अत्याचाराला प्रतिकार करण्यासाठी म. गांधींच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम खानदेशात शंकरराव ठकार यांच्या नेतृत्वाखाली या चळवळीला चालना मिळाली. मिठाच्या सत्याग्रहासाठी साक्री, शिरपूर, शिंदखेडा, धुळे या तालुक्यातील स्वयंसेवकांनी नावे नोंदविली. ठिकठिकाणी शिबिरे आयोजीत केली जात होती. पाटील, गावपाटीलकीचे राजीनामे देवून कायदेभंग चळवळीत सहभागी होते.

अनंत क्षीरे यांच्या नेतृत्वाखाली 5 स्वयंसेवकांची एक तुकडी विलेपार्ले येथे मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी रवाना झाली. सत्याग्रहींनी तेथून आणलेले मीठ बेकायदेश्शीरपणे धुळे येथे विकले जात होते, सभ घेतल्या जात होत्या. यावरून कॅप्टन देवरे, अनंत क्षीरे, शंकरराव ठकार आदींना पकडून 8 महीने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. तेव्हा साक्री तालुक्यातील जनतेने हरताळ पाळला. बाजार बंद केले. विदेशी कापडाची होळी करण्यात आली. धुळे, शिंदखेडा, नेर, कुसुंबा, पिंपळनेर येथे मद्यपान निरोधनाची चळवळी सुरु झाली.[4]

### दांडी–मीठ सत्याग्रह

दांडीस मीठाचा कायदेभंग केला म्हणून गांधीजींना अटक करण्यात आली. याचे वृत्त कळताच धुळ्याला सरकारच्या या कृतीचा निषेध करण्यासाठी सभा आयोजीत करण्यात आली. धुळ्याच्या मिल कामगारांनी कामावर बहिष्कार टाकला. ठिकठिकाणी हरताळ पाळण्यात आला.[5]

### शिरोडे : मीठ सत्याग्रह

रत्नागिरी जिल्ह्यातील शिरोडे येथे मीठाचा सत्याग्रह करण्यात आला. हा सत्याग्रह 12 मे 1930 ते 22 मे 1930 पर्यंत झाला. सत्याग्रहाची सुरुवात होण्यापूर्वीच शंकरराव देवांना अटक करण्यात आली. गांधीजींच्या ह्या सत्याग्रहाचे स्वरुप सामुदायिक बनले होते. सत्याग्रहींवर शिरोडे येथे निर्दयी लाठी हल्ला करण्यात आला. दोंडाईचाचे रंगनाथ टोणगावकर यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम खानदेशचे सत्याग्रही शिरोड्याला गेले होते. कापडणे, सवाई मुकटी, नावरानावरी, पिंपळनेर इत्यादी गावाच्या 3 तुकड्या होत्या. शिरोड्याच्या सत्याग्रहींवर झालेल्या लाठी हल्ल्याचे वृत्त ऐकूण पश्चिम खानदेशात शहादा तालुक्यातील पोलीस पाटलांनी राजीनामे दिले. लोकल बोर्डाच्या सदस्यांनी राजीनामे दिले, साक्री तालुक्यातील जनतेने सरकारी कर्मचाऱ्यांवर बहिःष्कार टाकला. शिरपूरला जाहीर सभेत बेकायदेशीर मीठ विक्री करण्यात आली. शंकरराव देव, डॉ. पटवर्धन, कन्हैय्यालाल वाणी, डॉ. उत्तमराव पाटील आदींना अटक करण्यात आली. अशारितीने साध्या मीठाच्या सत्याग्रहाने खानदेशसह संपूर्ण देशभ्र ब्रिटिश सरकारला घबरवून सोडले.[6]

***संदर्भसूची***

1.पवार जयसिंगराव, पवार मंजुश्री, आधुनिक भारताचा इतिहास, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर, 2007, पृ. 257.

2.शहा मु. ब. (संपा.) सत्वगुणी (श्री. कांतीलाल गुजराती गौरव ग्रंथ), श्री. कांतीलाल गुजरात सत्कार समिती, धुळे, 1994, पृ.156,157.

3.महाजन प्राचार्य गो.हू. (संपा.) धुळे जिल्हा कॉंग्रेस शताब्दी महोत्सव स्मरणिका, 1985, पृ. 38.

4.पांडे डॉ. मधुकर, खानदेशातील स्वातंत्र्य चळवळ, समाविष्ट : खानदेशचा सांस्कृतीक इतिहास, (संपा.), डॉ. मु. ब. शहा, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, खंड 3 व 4, जानेवारी 2004, पृ.4,5.

5.बापट गो. म. (संपा.), धुळे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव ग्रंथ, धुळे, 1988, पृ. 14,15?

6.चौधरी डॉ. कि. का., जळगाव जिल्हा, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, 1994, पृ. 128.



***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net